**ठळक बातम्या**

- विधिमंडळाच्या पुढच्या अधिवेशनात धर्मांतरविरोधी कायदा आणण्याची सरकारची विधानपरिषदेत ग्वाही

- महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक विधानपरिषदेतही मंजूर, अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा मार्ग मोकळा

- गेल्या महिन्यात चलनफुगवट्याच्या दरात  घसरण

- भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि इतरांचा अंतराळ स्थानकातून  परतीच्या प्रवास सुरु

- ज्येष्ठ अभिनेत्री बी सरोजा यांचं आज बंगळुरुमध्ये निधन

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारत पराभवाच्या छायेत

**<><><><><>**

राज्य सरकार लवकरच धर्मांतरविरोधी कायदा आणेल, असं गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. राज्यात बळजबरीनं धर्मांतर करण्याच्या प्रकरणांचा अभ्यास करण्यासाठी पोलीस महानिरीक्षकांची समिती आधीच कार्यरत असून या समितीच्या अहवालानुसार राज्य सरकार धर्मांतरविरोधी कायदा करेल, असं ते म्हणाले.....

**होल्ड - बाईट - भोयर**

येत्या अधिवेशनात गोतस्करीबंदी कायदा आणू, असं आश्वासनही त्यांनी दिलं. गोरक्षकांवर लागलेल्या आरोपांचा अभ्यास करून ते मागं घेतले जातील, असं ते म्हणाले.

मृद आणि जलसंधारण विभागातल्या एकूण ८ हजार ६६७ पदांच्या भर्तीला उच्चस्तरीय समितीनं मंजुरी दिली असून, लवकरच भरती प्रक्रिया सुरू होणार असल्याचं या खात्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितलं.

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५ ला आज विधानपरिषदेनं मंजुरी दिली. हे विधेयक विधानसभेनं आधीच मंजूर केलं आहे. त्यामुळे राज्यात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर एनडीपीएस कायद्यासोबतच मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) ( दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ ही आज विधानपरिषदेत मंजूर झालं.

**<><><><><>**

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात त्याआधीच्या महिन्याच्या तुलनेत ७२ शतांशांनी कमी झाला आहे. मे महिन्यात हा दर २ पूर्णांक ८२ शतांश टक्के होता. तो जूनमधे २ पूर्णांक १ दशांश टक्के पर्यंत खाली आला. जानेवारी २०१९ पासूनचा हा चलनफुगवटा दराचा नीचांक आहे. या महिन्यात भाज्या, अन्नधान्य, मांस, मासे,मसाले तसंच साखर आणि दुग्धजन्य पदार्थांचे भाव कमी राहिल्यानं ही घट दिसून येत असल्याचं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जाहीर केलेली आकडेवारी सांगते.

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर उणे १३ शतांश टक्क्यांपर्यंत घसरला आहे.

**<><><><><>**

वर्ष २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्यासाठी सरकारनं एक दृष्टीकोन निश्चित केला आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत विकास परिषदेच्या ६३ व्या स्थापना दिन समारंभात बोलत होते. आपल्या देशाच्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगताना कर्तव्याची जाणीव निर्माण करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं असल्याचं त्यांनी सांगितलं. भारत विकास परिषदेनं देशातल्या कोट्यवधी लोकांच्या जीवनात लक्षणीय बदल घडवून आणला असून, स्वातंत्र्याचा शतकोत्सव साजरा होईल, तेव्हाही देशाच्या विकासात ही संस्था योगदान देतच असेल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. ऑगस्ट महिन्यात अंतिम सुनावणीला सुरुवात करू, असं सांगत न्यायालयानं आज सुनावणी पुढं ढकलली. आज, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत त्यामुळे आता नव्यानं अर्ज करणं बंद करावं, असं त्यांनी ठाकरे गटाला सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू यांनी दोन नवीन राज्यपाल आणि एका नायब राज्यपालांच्या नियुक्त्या आज जाहीर केल्या. यात हरियाणाच्या राज्यपालपदी प्रोफेसर अशीम कुमार घोष, गोव्याच्या राज्यपालपदी पशुपती अशोक गजपती राजू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखचे नायबराज्यपाल निवृत्त ब्रिगेडिअर डॉ. बी.डी. मिश्रा यांचा राजीनामा राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू यांनी स्वीकारला असून त्यांच्या जागी कविंदर गुप्ता यांची नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि ऑक्सिओम-4 मोहिमेतले त्यांचे तीन सहकारी आज अतराळ स्थानकातून परतीच्या प्रवासाला निघाले आहेत. निर्धारित वेळेपेक्षा १५ मिनिटे विलंबानं स्पेस एक्सचं ड्रॅगन अंतराळ यान अंतराळ स्थानकापासून विलग झालं. उद्या दुपारी तीन वाजता हे अंतराळ यान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर उतरेल.

त्यानंतर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी शुक्ला इतर सहकाऱ्यांसह फ्लाईट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवसांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये सहभागी होतील.

या मोहिमेअंतर्गत १४ दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी विशेष सात प्रयोग केले आहेत. अंतराळ स्थानकातून निघण्यापूर्वी शुक्ला यांनी सांगितलं, ...

**होल्ड - बाईट- शुभांशु शुक्ला**

**- <><><><><>**

अभिनय सरस्वती म्हणून प्रसिद्ध असलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री बी सरोजा यांचं आज बंगळुरुमध्ये निधन झालं. त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांनी १९५५ मध्ये महाकवी कालिदास चित्रपटाद्वारे अभिनेत्री म्हणून चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. सात दशकांहून अधिक काळ चित्रपट कारकिर्दीत त्यांनी कन्नड, तमिळ, तेलगू आणि हिंदी भाषेतल्या २०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं. ब्रिटिशांशी लढणाऱ्या कित्तूरच्या शूर राणी चेन्नम्माची भूमिका साकारून त्यांनी कन्नड चित्रपट रसिकांची मने जिंकली. भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या मौल्यवान योगदानाबद्दल सरोजा देवी यांना पद्मश्री आणि पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. त्यांनी राजेंद्र कुमार आणि शम्मी कपूर यांच्यासोबत आशा, घराना आणि मेहेंदी लगा के रखना या हिंदी चित्रपटांमध्ये उल्लेखनीय भूमिका केल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बी सरोजा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><>**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज कर्नाटकातल्या शिवमोग्गा जिल्ह्याच्या सागर तालुक्यातल्या  शरावती खाडीवर उभारलेल्या भारतातल्या केबल आधारित दुसऱ्या सर्वाधिक लांबीच्या सिगंदूर पुलाचं उदघाटन केलं.  कर्नाटकातल्या सागरा आणि मारकुटीका यांना जोडणारा हा सुमारे अडीच किलोमीटर लांबीचा हा पूल १६ मीटर रुंद असून त्याच्या उभारणीसाठी ४७० कोटी रुपयांहून अधिक खर्च झाला आहे. १९६० दरम्यान बांधण्यात आलेल्या लिंगानामक्की धरणामुळं उर्वरित कर्नाटकाशी संपर्क तुटलेल्या सागरा तालुक्यातल्या नागरिकांसाठी हा पूल एक वरदान ठरणार आहे.

**<><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारत पराभवाच्या छायेत आहे. लॉर्ड्स मैदानावर सुरु असलेल्या या सामन्याच्या पहिल्या डावात दोन्ही संघांनी प्रत्येकी ३८७ धावा केल्या होत्या. इंग्लडचा दुसरा डाव १९२ धावांवर गुंडाळण्यात आज भारताला यश आलं. मात्र या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची फलंदाजी पूर्णपणे गडगडली. यशस्वी जैस्वाल आणि वॉशिंग्टन सुंदर एकही धाव न करता तंबूत परतले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ९ बाद १४९ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

५७व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमधे सहभागी झालेल्या सर्व ४ भारतीय विद्यार्थ्यांनी पदक मिळवलं असून पदक तालिकेत भारताला सहावं

स्थान मिळालं आहे. जळगावचा देवेश पंकज भैया आणि हैद्राबादचा संदीप कुची यांना सुवर्णपदक मिळालं असून भुवनेश्वरचा देबदत्त प्रियदर्शी आणि नवी दिल्लीचा उज्ज्वल केसरी या विद्यार्थ्यांनी रौप्य पदकं मिळवली आहेत. संयुक्त अरब अमिरातींमधे दुबई इथं ५ जुलैला सुरु झालेल्या या ऑलिंपियाडचा आज समारोप झाला. ९० देशांनी त्यात सहभाग नोंदवला असून पदक तालिकेत भारताला सहावं स्थान मिळालं.

**//<><><><><>//**